# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: एक विश्लेषण

**डॉ. भारत सुरेशराव कडबे**
सहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग
नबीरा महाविद्यालय, काटोल
मो.नं. – ८२०८८७७२५४
Email Id :- bharatkadbe@gmail.com

---

**प्रस्तावना :**

परिवर्तन हा समाजाचा नियम आहे. मानवी संस्कृतीचा इतिहास लक्षात घेता समाज हा सतत परिवर्तनशील राहीलेला आहे. किंग्जले डेव्हिस यांच्या मते, ‘‘समाजरचनेत व कार्यात म्हणजेच सामाजिक संघटनेत होणारे बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय’’ अशा बदलातून समाज जुनी कात टाकून नवनवीन विचार धारण करीत असतो. त्यामुळे समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक शैक्षणिक क्षेत्रातील बदल हे देशाला पुरोगामित्वाच्या, प्रगतीच्या, विकासाच्या दिशेने घेऊन जाते. त्यामुळेच शिक्षण हे सामाजिक बदलाचे सर्वोत्तम माध्यम आहे. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला ‘वाघिणीचे दूध’ संबोधले आहे. शिक्षण हे परिवर्तनाचे सर्वोच्च उदाहरण आहे. अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ प्रा. जॉन ड्युई म्हणतात की, ‘‘सजीव व निर्जीव प्राण्यातील अतिशय महत्त्वाचा तसेच नजरेत दिसून येणारा फरक म्हणजे सजीव प्राणी आपल्याला सतत नवनवीनतेत परावर्तित करून आपले अस्तित्व कायम टिकवित असतो’’ [१]

त्यामुळे शिक्षणाचा सामाजिक परिवर्तनाशी जवळचा संबंध आहे. ‘अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण’ या मानवाच्या मूलभूत गरजा आहे. शिक्षण ही मानवाची मूलभूत नैसर्गिक गरज आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत शिक्षण ही एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. परंतु जसजसा काळ बदलत गेला. तसतसे शिक्षणाबाबत समाजाचा दृष्टिकोन बदलत गेला. पुरोगामी, विज्ञाननिष्ठ, राष्ट्रप्रेमी समाज निर्माण करायचा असेल तर शिक्षण हे सर्वांना प्राप्त झाले पाहिजे. जीर्ण रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा दूर करण्यासाठी एका आदर्श, समतावादी, बंधुत्ववादी समाजाच्या निर्मितीसाठी शिक्षण हे अत्यंत आवश्यक आहे. ‘‘शिक्षण हे परिवर्तनाचे महान तत्त्व असल्यामुळे त्याचा सामाजिक परिवर्तनातील सहभाग अतिशय महत्त्वाचा ठरतो.’’[२] भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविण्याच्या प्रक्रियेत शिक्षण आणि काळानुरूप ज्ञान हे प्रभावी शस्त्र ठरणार आहे. याच उदात्त हेतूने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची रचना करण्यात आलेली आहे.

**शिक्षणातील बदलते प्रवाह :**

चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील शिक्षण हे विशिष्ट वर्गापुरते मर्यादित होते. परंतु आधुनिक काळात भारताच्या दृष्टीने विचार केल्यास महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून भारतीय शिक्षण पद्धतीत आमुलाग्र बदल होत गेले. ‘‘खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले. तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाज पद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आलेले आहे. त्याचे त्यांच्या स्वत:च्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याची जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही.

आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मते हेच (शिक्षण) औषध आहे''[३] १ जानेवारी १८४८ रोजी महात्मा फुले यांनी पुणे येथे भारतातील पहिली शाळा स्थापन केली. सावित्रिबाई फुले या भारतातील पहिल्या शिक्षिका आणि मुख्याध्यापिका होत्या. भारतात शैक्षणिक बदलाची सुरुवात ही ब्रिटीश काळापासून सुरू झाली. ब्रिटीश आमदनीत १९ जुलै १८५४ या वर्षी सर चार्ल्स वुड यांच्या काळात सर्वप्रथम शिक्षणविषयक सुधारणा करण्यात आल्या. हा अहवाल भारतीय शिक्षण व्यवस्थेत 'वुडचा खलिता' या नावाने प्रसिद्ध आहे. या शैक्षणिक अहवालाचा परिणाम भारतांवर साधारणत: ५० वर्षांपेक्षा अधिक काळ होता. पुढे ब्रिटीश काळामध्येच २७ जानेवारी १९०२ या वर्षी ब्रिटीश व्हाईसरायच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य रॅक्ले यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय विद्यापीठ आयोग नेमण्यात आला. भारतीय विद्यापीठांची रूपरेषा आणि सुधारणा या आयोगाने सूचविल्या.

१९१७ साली ब्रिटीश काळामध्येच 'कलकत्ता विद्यापीठ आयोग' स्थापन करण्यात आला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली १९४८ मध्ये एक शिक्षण आयोग नेमण्यात आला. यालाच 'राधाकृष्णन आयोग' म्हटल्या जाते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील उच्च शिक्षणाला दिशा देण्याचे काम या आयोगाने केले. पुढे १९५३ मध्ये 'मुदलियार आयोग' स्थापन करण्यात आला. पुढे १९६४ साली डॉ. डी. एच. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली 'कोठारी शिक्षण आयोग' स्थापन करण्यात आला. पुढे १६ फेब्रुवारी १९८३ रोजी भारत सरकारने डी. पी. चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय शिक्षक आयोग' नेमला यात प्राथमिक, उच्च आणि व्यावसायिक शिक्षणातील शिक्षकांचे प्रश्न मांडण्यात आलेत.

पुढे १९८६ तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी नवीन शैक्षणिक धोरण लागू केले. यात प्रामुख्याने मुलींचे शिक्षण, अनुसूचित जाती, जमाती, मागास घटकातील वर्गाच्या शिक्षणावर भर देण्यात आला. १९९२ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने जनार्दन रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९६' प्रसिद्ध केले यात नवोदय विद्यालयांची स्थापना करण्यात आली. २००५ मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंह यांच्या काळात विविध शैक्षणिक बदल केल्या गेले. २००१ साली 'सर्व शिक्षा अभियान' राबविण्यात आले. त्यानंतर २०१० या वर्षीपासून 'शिक्षणाचा हक्क' कायदा अस्तित्त्वात आला. या कायद्यान्वये शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे असे ठरविल्या गेले.

उपरोक्त विविध शैक्षणिक आयोग आणि कायद्यांचा आढावा घेताना स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात विविध शैक्षणिक कायद्यान्वये देशातील शिक्षणाला निरंतर गतिमानता देण्यात आल्याचे दिसून येते. परंतु वर्तमान काळात पाहिले असता देशाचा पूर्णत: शैक्षणिक कायापालट झाल्याचे दिसून येत नाही. किंवा शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य झाले असे म्हणता येत नाही. काळाच्या विविध टप्प्यावर शिक्षण तज्ज्ञांनी एकत्र येऊन विविध शैक्षणिक कायदे अस्तित्वात आणले. मात्र या शैक्षणिक आयोग वा कायद्याची अंमलबजावणी करताना तत्कालीन काळानुसार अपेक्षित शैक्षणिक परिवर्तन झाले असे म्हणता येणार नाही. प्राचीन काळात शिक्षणाची सर्वोच्च परंपरा असणारे नालंदा, तक्षशिला, जगद्दल, इत्यादी विद्यापीठे भारतात होती. मात्र नंतर ही परंपरा खंडित झालेली दिसते. ''भारतीय विद्यापीठातून मिळणारे शिक्षण हे अत्यंत भिकार पद्धतीचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेसे मार्गदर्शन किंवा ज्ञान होत नाही. तसेच त्यांना संशोधक वृत्ती व स्वतंत्र विचारांची प्रेरणाही मिळत नाही''[४] त्यामुळे आज जागतिक क्रमवारीचा विचार केल्यास जगातील पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये भारतातील एकाही विद्यापीठाचा किंवा शिक्षण संस्थेचा समावेश नसावा हे देशासाठी निश्चितच

अभिमानास्पद नाही. कदाचित याच बाबीचा गंभीरपणे विचार करून वर्तमान सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे शिक्षणविषयक नवीन धोरण आणले असावे.

या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून (२०२०) देशातील शिक्षण व्यवस्थेत अपेक्षित बदल घडेल अशी आशा करायला पाहिजे.

**शैक्षणिक धोरण २०२० रूपरेषा:**

'भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे' हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे अंतिम उद्दिष्ट आहे. म्हणूनच मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून 'शिक्षण मंत्रालय' ठेवण्यात आलेले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून शिक्षण क्षेत्रात झालेला हा तिसरा मोठा बदल आहे. भारताच्या प्रगतीच्या दृष्टीने आर्थिक विकास, सामाजिक न्याय, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन इत्यादी क्षेत्रामध्ये जागतिक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी समाजातील सर्व घटकांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहे. हा बदल लक्षात घेऊन शैक्षणिक अभ्यासक्रमाची आखणी करणे आवश्यक आहे. संगणक, विज्ञान, तंत्रज्ञान, गणित, समाजशास्त्र आणि मानसशास्त्रे इत्यादी विद्याशाखांमधील बदल लक्षात घेऊन वैज्ञानिक, तांत्रिक, नैतिक, मूल्यांवर आधारित रोगजाराभिमुख, आणि व्यवहारोपयोगी शिक्षणाची अंमलबजावणी हे उद्दिष्ट समोर आहे. याचबरोबर शिक्षण सर्वसमावेशक होण्यासाठी मूलभूत कला, खेळ, क्रीडा, स्वास्थ्य, भाषा, साहित्य, संस्कृती आणि मूल्ये यांचा समावेश नवीन शैक्षणिक धोरणात अपेक्षित आहे. डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेतून सांगायचे तर शिक्षणामुळे चारित्र्य, शील, नीती, सहानुभूती, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, प्रज्ञा, करुणा इत्यादी मूल्यांचा विकास नवीन शैक्षणिक धोरणात अपेक्षित आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०हे २१ च्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. या धोरणानुसार देशाचा शाश्वत शैक्षणिक विकास अपेक्षित आहे. प्राचीन भारतीय ज्ञान, परंपरांचा समृद्ध वारसा लक्षात घेता प्राचीन भारतातील नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला, वल्लभी, जगद्दल इ. जागतिक दर्जाच्या शिक्षण क्षेत्रात उच्च मानके तयार करणाऱ्या प्राचीन भारतीय विद्यापीठांचे वर्तमान परिप्रेक्षात पुनरुज्जीवन करणे हेही नवीन शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. प्राचीन काळात देश–विदेशातील विद्वान आणि विद्यार्थी भारतात शिक्षणासाठी येत असायचे याच पार्श्वभूमीचा विचार करून नवीन शैक्षणिक धोरण आणि अशा जागतिक दर्जाच्या शिक्षण संस्थांची उभारणी हे महत्त्वाचे उद्दिष्टे आहे. प्राचीन भारतीय परंपरेतील चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमिहीर, भास्कराचार्य, पाणिनी, पतंजली, नागार्जुन, मैत्रेयी, गार्गी इत्यादी विद्वानांची परंपरा असणाऱ्या भारताला २१ व्या शतकात जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे आणि प्राचीन काळातील कालातीत प्रतिभा पुन: या देशात नव्याने निर्माण करणे इ. आदर्श उद्दिष्ट नवीन शैक्षणिक धोरणात अपेक्षित आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात गुणवत्तापूर्ण शिक्षण, भारताचा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण वारसा जपणे, ज्ञानाची उज्ज्वल परंपरा जोपासणे, राष्ट्रीय अभिमान, आत्मविश्वास, परस्पर सहकार्य, आणि एकात्मता इ. मूल्यांची वाढ नवीन पिढीमध्ये होणे अपेक्षित आहे. नवीन शैक्षणिक धोरणात विज्ञाननिष्ठा, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी जोपासणारी पिढी तयार करणे देशाच्या, समाजाच्या उभारणीत योगदान देणारे नागरिक घडविणे ही या धोरणाची तत्त्वे आहेत.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची उद्दिष्टे :**

नवीन शैक्षणिक धोरणात प्रामुख्याने प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, प्रौढ व

निरंतर शिक्षण भारतीय भाषा आणि संस्कृतीला प्रोत्साहन, तंत्रज्ञानाचा वापर आणि एकात्मिकरण, ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षण, तंत्रज्ञानाचा समावेश याचबरोबर दर्जेदार विद्यापीठे आणि महाविद्यालये यांची निर्मिती करणे तसेच प्रेरित आणि सक्षम शिक्षकांची निर्मिती करणे इत्यादींच्या माध्यमातून

१ विद्यार्थ्यांमधील क्षमतांचा शोध घेऊन शिक्षक आणि पालकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक क्षेत्रामध्ये संधी उपलब्ध करणे शिक्षणाप्रती जागृत विद्यार्थी आणि चारित्र्यसंपन्न नागरिक घडविणे.

२ शिक्षणाचे अंतिम ध्येय हे ज्ञानप्राप्ती असावे. शिक्षणाची घसरलेली गुणवत्ता वाढविणे आणि बहुआयामी शिक्षण व्यवस्था उभारणे. शिक्षण चार भिंतीच्या आत न राहता ते प्रायोगिक असायला पाहिजे ज्ञान हे गुण किंवा मार्कांच्या आतून बाहेर पडून कौशल्याधारित झाले पाहीजे.

३ कला, वाणिज्य आणि विज्ञान इ. ज्ञानशाखांचा मेळ घालणारे शिक्षण निर्माण करता आले पाहिजे. विद्यार्थी हे मशीन नाही याची जाणीव पालक, शिक्षक आणि समाजात केली पाहिजे विद्यार्थ्यांकडून अवास्तव अपेक्षा करणे, त्यांना अपेक्षेच्या ओझ्यातून बाहेर काढले पाहिजे, घोकंपट्टी, पाठांतर, कॉपी या बाबी शिक्षणातून दूर करायला पाहीजे.

४ मातृभाषेतून शिक्षण हा विद्यार्थ्याचा अधिकार मानायला पाहीजे. अध्ययन आणि अध्यापणात बहुभाषिक धोरण स्वीकारून मातृभाषेला प्राधान्य द्यायला पाहीजे.

५ अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा पूरेपूर वापर करायला पाहीजे.

६ शिक्षण प्रक्रियेत समानता आणि सर्वसमावेशकता या मूल्यांचा विकास व्हायला पाहिजे. भारताच्या समृद्ध संस्कृतीचा प्राचीन व आधुनिक संस्कृतीचा अभिमान निर्माण होईल अशी व्यवस्था विकसित करायला पाहिजे.

७ 'शिक्षण स्वातंत्र्य' ही संकल्पना समाजात रूजविली पाहिजे. शिक्षण ही सार्वजनिक सेवा आहे हे गृहीतक लक्षात घेऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध केले पाहीजे. एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलू शकणारी शिक्षण व्यवस्था उभी करायला पाहिजे

८ गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी उत्कृष्ट दर्जाचे संशोधन करून शिक्षण तज्ज्ञाद्वारे नियमित मूल्यांकनाद्वारे प्रगतीचा सातत्यपूर्ण आढावा घ्यायला पाहिजे. कारकून बनविणारे शिक्षण थांबवून एक सशक्त शिक्षण व्यवस्था उभारायला पाहिजे.

**नवीन शैक्षणिक धोरण २०२० चा आराखडा :**

नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये '५+३+३+४' पद्धतीनुसार विद्यार्थ्यांच्या पायाभूत अवस्थेत ५ वर्षे, तयारीच्या टप्प्यात ३ वर्षे, मधल्या टप्प्यात ३ वर्षे आणि माध्यमिक टप्प्यात ४ वर्षे असेल. १९६४ मध्ये देशाचे शैक्षणिक धोरण 'कोठारी आयोगाच्या' शिफारशींवर आधारित होते. यानुसार '१०+२+३' अशी शैक्षणिक प्रणाली स्वीकारण्यात आलेली होती. याचबरोबर त्रिभाषा सूत्र अवलंबण्यात आले होते. यात प्रथम भाषा मातृभाषा, द्वितीय भाषा हिंदी (राष्ट्रभाषा) आणि तृतीय भाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार करण्यात आलेला होता. परंतु नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये यात बदल सूचविण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने

१) पायाभूत स्तर – ५ वर्षे (वय – ३ ते ८ वर्षे ) अंगणवाडी, पूर्व प्राथमिक शाळा बालवाडी, (वय – ३ ते ६ वर्षे ) इयत्ता १ आणि २ वय ६ ते ८ वर्षे हा टप्पा असून यात सामाजिक, भावनिक आणि सर्जनशील कौशल्ये विकसित करणे व खेळावर आधारित शिक्षणावर लक्ष केंद्रित

करणे हे मुद्दे आहेत.

२) पूर्व अध्ययन स्तर ८ ते ११ वर्षे इयत्ता ३ ते ५ हा टप्पा प्रकल्प आणि अनुभवात्मक शिक्षणावर लक्ष केंद्रित करेल

३) पूर्व माध्यमिक स्तर — वय ११ ते १४ इयत्ता ६ ते ८ करिता असून यात विश्लेषणात्मक कौशल्ये विकसित केली जाईल.

४) माध्यमिक स्तर — वय १४ ते १८ इयत्ता ९ ते १२ असून या टप्प्यात व्यवसायिक आणि शैक्षणिक कौशल्ये विकसित केली जाईल.

५) याचबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे तसेच अभ्यासक्रमात लवचिकता असेल, बहुविद्याशाखीय शिक्षणाबरोबरच तंत्रज्ञानावर भर देऊन शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे यात अभिप्रेत आहे.

६) पदवीचे शिक्षण ४ वर्षाचे असेल, बी. एड. ४ वर्षे याचबरोबर एम. फिल. अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणात बंद करण्यात येईल.

७) या पद्धतीत शिक्षकांवरील जबाबदारी महत्त्वाची असणार आहे. शिक्षण प्रक्रिया आणि विद्यार्थी यातील महत्त्वाचा दुवा म्हणजेच शिक्षक असणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि प्राध्यापकांची भरती प्रक्रिया, व्यावसायिक कौशल्ये सातत्यपूर्ण विकसित करणे, शिक्षकांना अद्ययावत राहणे आवश्यक ठरणार आहे.

८) नवीन पद्धतीत ऑनलाईन मूल्यांकन आणि अध्ययनाची मिश्र पद्धत असेल. यासाठी जागतिक दर्जाच्या डिजिटल पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या जातील यात प्रामुख्याने शिक्षण, प्रशासन, तंत्रज्ञान, अध्यापनशास्त्र आणि मूल्यांकन, ई—शासन इ. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ समाविष्ट असेल

**नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी २०२३ पासून टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येईल. या आयोगाचे अध्यक्ष भारताचे प्रधानमंत्री असेल नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे पहिले राज्य कर्नाटक ठरले आहे. त्याचबरोबर मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, तेलंगणा महाराष्ट्र, आंध्रप्रदेश राजस्थान इ. राज्यात याची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. महाराष्ट्रात २०२३ पासून या नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जाईल. यासाठी ''केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाचे सक्षमीकरण केले जाईल. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे रूपांतर (MHRD) शिक्षण मंत्रालयात केले जाईल. ''[५]

''दर्जेदार शिक्षणासाठी भक्कम अर्थपुरवठा करण्यात येईल. सध्या भारतातील शिक्षण क्षेत्रावर केला जाणारा खर्च हा विकसित देशांच्या तुलनेत फार कमी आहे. ही वास्तवता स्वीकारून शिक्षणावरील खर्च देशाच्या एकूण GDP च्या ६ टक्के पर्यंत पोहचविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे एकत्रितपणे काम करतील''[६]

समाजातील वंचित आणि मागास घटकांसांठी शैक्षणिक संसाधने पुरविणे पोषणविषयक साहाय्य करणे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या आणि हिताच्या बाबी लक्षात घेऊन सर्व मागास घटकांसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले जातील.

''नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासन, शिक्षकाशी संबंधित मंत्रालये, राज्याचे शिक्षण विभाग, बोर्ड, NTA उच्च शिक्षण संस्थाने NCERT, SCERTS शाळा विविध शिक्षण संस्था यांच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित संस्थांमध्ये समन्वय साधून या धोरणाची अंमलबजावणी

केली जाईल.''[७] या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्याद्वारे वार्षिक परीक्षण केले जाईल.

**समारोप :**

नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे सर्वसमावेशक असे धोरण आहे जे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यास साहाय्यभूत होणार आहे. या धोरणात अभ्यासक्रमात लवचिकता आणि निवड स्वातंत्र्य राहणार आहे. तंत्रज्ञानावर भर देण्यात येणार आहे. सामाजिक, आर्थिक भेदभाव न करता गुणवत्ता व उत्तरदायित्व सिद्ध करणारे ठरणार आहे. यात प्रामुख्याने ग्रामीण व शहरी भागातील शैक्षणिक दरी कमी करण्यात येणार आहे. या धोरणाच्या माध्यमातून सर्वच भारतीय भाषांचे संवर्धन, वृद्धी करण्यात येणार आहे. हे धोरण विद्यार्थ्यांवर आधारित राहणार असून यात प्रामुख्याने स्वतःच्या उद्योग, व्यवसायावर भर देण्यात येणार आहे. या धोरणात भारतातील शिक्षण व्यवस्थेचे आंतरराष्ट्रीयकरण करण्यावर भर राहणार आहे. यानुसार परदेशी विद्यापीठे भारतात आपले कॅम्पस स्थापन करू शकतील तसेच खाजगी व सार्वजनिक विद्यापीठांचे शूल्क निर्धारित केले जातील. एकूनच नवीन शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे, आराखडा, शैक्षणिक प्रक्रियेतील बदलते प्रवाह आणि देशाच्या विकासाचा दूरदृष्टीने विचार केलेला आहे. परंतु सदरचे शिक्षण धोरण किती उपयुक्त आणि व्यवहारपयोगी राहील याचे भवितव्य येणारा काळच ठरविणार आहे.

**निष्कर्ष :**

१) भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे हे नवीन शैक्षणिक धोरण २०२० चे अंतिम उद्दिष्ट आहे.

२) प्राथमिक व उच्च शिक्षणाची पुनर्रचना नवीन धोरणात करण्यात आलेली आहे.

३) शिक्षण पद्धती अधिक लोकाभिमुख बनविण्यावर भर आहे तसेच राष्ट्रीय संपत्तीचा योग्य वापर व विकास अभिप्रेत आहे.

४) नवीन धोरणात राष्ट्रीय अस्मिता, स्वातंत्र्यलढा, सामाजिक, सांस्कृतिक वारसा, लोकशाही, धर्मनिरपेक्षता स्त्री–पुरुष, समानता, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समस्यांचे निर्मूलन, रोजगाराभिमुख शिक्षण, वैज्ञानिक व तांत्रिक, शिक्षणावर भर देण्यात आला आहे.

५) भारतातील साक्षरतेचे प्रमाण वाढविणे, स्त्री–पुरुष, शिक्षणातील दरी कमी करणे, ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करण्यावर भर आहे.

६) विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्य, नितिमत्ता, शील, प्रज्ञा निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे.

७) नव्या युगाची आव्हाने ओळखून अभ्यासक्रमाची आखणी व निवड अभिप्रेत आहे.

८) प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांची गळती कमी करणे, सर्वसमावेशक आणि सर्वांसाठी शिक्षण हे उद्दिष्ट समोर ठेवणे तसेच शाळांमधील अभ्यासक्रम अधिक रंजक आणि आनंददायी बनविणे हे उद्दिष्ट आहे.

९) शिक्षण संस्थांची पुनर्रचना करून बळकटीकरण करणे, दर्जेदार विद्यापीठे आणि महाविद्यालयांची उभारणी करणे, उच्च शिक्षणात समता आणि समावेशकता आणणे, शिक्षणासाठी अनुकूल वातावरण तयार करणे, व्यावसायिक, प्रौढ आणि निरंतर शिक्षणाला चालना देणे, भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणे इ. सर्वसमावेशक धोरण यात आहे.

१०) केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या माध्यमातून सुयोग्य व्यवस्थापन आणि अर्थ पुरवठा करून शिक्षणाचा विकास आणि विस्तार करणे इत्यादी बाबी नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अभिप्रेत आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


- John Dewey Democracy & Education, London, १९६६ पृ. क्र. ९
- डी. वाय. हाडेकर, डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००५, पृ. क्र. ७०
- महात्मा जोतीराव फुले, शेतकऱ्यांचा आसूड, समग्र महात्मा फुले, धनंजय कीर, (संपादक मालशे), मुंबई, १९८८ (उपाद्घात)
- डी. वाय. हाडेकर, (तत्रैव) पृ. क्र. १७१
- राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० शिक्षण मंत्रालय, भारत सरकार पृष्ठ क्र. ८१
- तत्रैव पृ. क्र. ८३
- तत्रैव पृ. क्र. ८४